
Special Issue
Part-02
January 2020

VIDYAWARTA®

Peer Reviewed International Refereed Research Journal

# "साहित्य, समाज आणि संस्कृती"



संपादक
प्रा.डॉ.औदुंबर जाधव

सहसंपादक
प्रा.पवार राजकुमार
प्रा.दत्ता सरगर

# Index

01) Exploring Communal Crisis In Mahesh Dattani's Final Solutions
**Dr. Sanjay S. Shivsharan, Mangalwedha** ||18

02) Financial Inclusion In India - A Review
**Prof.Samadhan Vishnu Bhagare, Mangalwedha** ||20

03) संत तुकारामांच्या अभंगातील चिरंतन सामाजिक सत्य
**डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे, देगलूर** ||25

04) संत तुकारामांच्या अभंगातील समाजदर्शन
**लक्ष्मी जाधव, मिरज** ||29

05) बदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारा भाकरीची शपथ कथा संग्रह
**डॉ. संजय पाटोळे, रत्नागिरी** ||33

06) दलित कवितेतील समाजदर्शन
**प्रा. प्रेरणा एल. चव्हाण, कोल्हापूर** ||37

07) आदिवासी समाज संस्कृती आणि साहित्य
**प्रा.डॉ. राजेश धनजकर, परभणी** ||39

08) भाषा, साहित्य, समाज आणि संस्कृती : एक चिंतन
**प्रा.डॉ. डी. आर. गाकयवाड, सोलापूर** ||43

09) संत साहित्याचे सामाजिक संदर्भ
**डॉ. सुवर्णा गुंड–चव्हाण, वडाळा** ||46

10) औरंगाबाद येथील अंजिठा वेरुळ लेण्यांचा एक सांस्कृतिक, भौगोलिक अभ्यास
**डॉ. राजेश भिमराव गावकरे, मंगळवेढा** ||49

11) संत साहित्याचे सामाजिक संदर्भ
**डॉ. नवनाथ दणाणे, बार्शी** ||53

12) २००० नंतरची ग्रमिण कविता : विशेष संदर्भ ऐश्वर्य पाटेकर लिखीत भुंईशास्त्र
**प्रा.श्री. कृष्णा काशिराम कोटकर, वरूडचकपान** ||57

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

एकंदरीत दलित कवितेतून समाजातील जातीयता, विषमता, संस्कृती या घटकांवर आधारित चित्रण आल्याचे दिसून येते. तसेच दलित कवितेच्या मुळाशी डॉ.आंबेडकरांचया विचाराचे योगदान असल्याचेही दिसून येते. या दलित कवितेतून दलित बांधवांनी जातीयतेने हिरावून घेतलेला स्वाभिमान चित्रित केला आहे. तर दलित स्त्रिया दलित म्हणून आणि स्त्री म्हणून वाट्याला आलेले दु:ख दुहेरी स्वरूपाचे असल्याचे सांगितले आहे. कुटुंबात आणि समाजात स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळावी असे सांगितले आहे. सर्वच दलित कवितेतून दलित बांधव व स्त्रियांचे आत्मभान जागृत झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. रंगराव बी — 'मराठी दलित कविता', प्रल्हाद चेंदवणकर यांची कविता, (घोटभर पाण्यासाठी), साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, पुनरावृत्ती २०१५, पृ.४७.

२. रंगराव बी — 'मराठी दलित कविता', दया पवार यांची कविता, (तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा), साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, पुनरावृत्ती २०१५, पृ.७.

३. रंगराव बी — 'मराठी दलित कविता', युवराज सोनटक्के यांची कविता, (हाक), साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, पुनरावृत्ती २०१५, पृ.१०९.

४. रंगराव बी — 'मराठी दलित कविता', हिरा बनसोडे यांची कविता, (फिर्याद), साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, पुनरावृत्ती २०१५, पृ.५९.

५. रंगराव बी — 'मराठी दलित कविता', ज्योती लांजेवार यांची कविता, (तू कधी दिसली नाहीस), साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, पुनरावृत्ती २०१५, पृ.८४.

६. पारसे बिरा — 'दलित कवयित्रींची कविता', मिना गजभिये यांची कविता, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, पुनरावृत्ती १० सप्टेंबर २००८, पृ.२५.

७. पारसे बिरा — 'दलित कवयित्रींची कविता', उल्हासिनी कांबळे यांची कविता, निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, पुनरावृत्ती १० सप्टेंबर २००८, पृ.४२.

❑❑❑

07

# आदिवासी समाज संस्कृती आणि साहित्य

**प्रा.डॉ. राजेश धनजकर**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड, जि. परभणी

**********

आदिवासी हा जगाचा व या देशाचा मूळ मालक. या भूमीवर पाहिले पाऊल ठेवले ते आदिवासींनीच. जल, जंगल व जमिनीचा रक्षणकर्ता तोच. पशू—पक्षी हेच त्यांचे सगे सोयरे. निगर्स हाच त्यांचा सखासोबती. याच निसर्गाच्या सानिध्यात त्यांनी हजारो वर्षे काढली, अजूनही काढत आहेत. परंतु अलीकडच्या काळात या भूमीचा मालक बेघर झाला आहे. जल, जंगल व जमीन आता त्याच्या ताब्यात राहिली नाही. 'वनहक्क कायद्या' ने त्याची जमीन सरकारच्या ताब्यात गेली. त्यामुळे आदिवासींचे कवचकुंडलच गळून पडले. फुले, फळे, मोह, डिंक, तेदुपत्ता व वनौषधी आदिंवर त्यांचा अधिकार होता. परंतु आता तो संपुष्ठात आला. त्यामुळे त्याच्या जीवनाला घरघर लागली. निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्त जीवन जगणारा आदिवासी आज आपल्या नैसर्गिक जीवनाला पारखा होत असला, तरी अजूनही त्याने आपली नीतीमूल्ये गमावलेली नाहीत, तर ती जोपासून ठेवली आहेत. आणि म्हणूनच आदिवासी समाजात वर्णभेद व चातुर्वण्य व्यवस्थेला मुळीच थारा असलेला दिसत नाही.

आदिवासी लोक हेच खरेखुरे निसर्गपुत्र. निसर्ग जसा प्रामाणिक तसेच हे लोक असून, त्यांचे राहणीमान अगदी साधे असते. व्याभिचाराला आदिवासी समाजात अजिबात वाव नाही, उलट तो एक फार मोठा अपराध मानला जातो. गुन्हेगारी प्रवृत्ती या समाजात सोधूनही सापडत नाही. चोरी—चहाडी व लबाडी बियालाही सापडणार नाही. दिलेला शब्द काटेकोरपणे पाळणारा

प्रदेशात हे लोक आजही गुण्यागोविंदाने राहतात. निसर्गाच्या सहवासामुळे त्यांच्या मनात निसर्गाविषयी अत्यंत आदराची भावना असते आणि म्हणूनच आदिवासी लोक निसर्ग शक्तींना शरण जातात. एवढेच काय, निसर्गातील घटकांना देवत्व माणून त्याची पूजादेखील करतात. उदा. पूर्वजपूजा, वृक्षपूजा, पशूपूजा इ. 'आदिवासी जमातीमध्ये वंशजांना देव मानतात. आई—वडीलांची पूजा करतात.'[१]

अशा या आदिवासींची जीवन जगण्याची पध्दती सर्वस्वी निराळी आहे. त्यांचे सण—उत्सव देव—देवता, आचार विचार, नीतिनियम, भाषा, पूजा विधी, पेहराव हे स्वतंत्र आहेत. हिंदू संस्कृती आणि आदिमांची संस्कृती भिन्न आहे. आदिवासी हा हिंदू संस्कृतीच्या व धर्माच्या बाहेरचा समाज आहे. निसर्गाला तो आपला धर्म मानतो व त्यानुसार धर्माचरण करतो. हजारो वर्षापासून आदिवासींनी निसर्गाला धर्म मानले. तसं पाहिलं तर, आदिवासी संस्कृतीचा जन्मच मुळात निसर्गाच्या सानिध्यात झाला. ती वाढली व विकास पावली जंगलातच आणि म्हणूनच निसर्गाचा आणि आदिवासींचा फार घनिष्ठ संबंध असलेला दिसतो. निसर्गातील अनेक गुण जसे आदिवासींनी हेरले, तसेच पशू—पक्षांचे गुण देखील अवगत केले. झाडावर सरसर चढणे, वेगाणे धावणे, विविध पशू—पक्षांचा आवाज काढणे, डोंगर व कडेकपारी सहज पार करणे या सारखे गुण आजही आदिवासीत पहावयास मिळतात.

'निसर्ग हा शक्तीमान आहे, पण तो माणसाचा शत्रू नाही त्याला जिंकून घेण्याची भाषा व्यर्थ आहे. कारण निसर्ग माणसापासून वेगळा नाही आणि माणूसही निसर्गापासून वेगळा नाही. निसर्ग लहरी आहे, हे निश्चितच खरं आहे; पण तरीही त्याला काही नियम आहेत. ह्या नियमांचा उपयोग करुन निसर्गाला नाराज न करताही, त्याला प्रसन्न ठेवून, त्याचा मान राखून त्याचा उपयोग करुन घेता येतो. असा निसर्गविषयक दृष्टीकोन हा आदिवासी जीवनाविषयक दृष्टीकोनाचे एक अंग आहे. निसर्गाशी स्पर्धा करुन नव्हे, त्याच्याशी शत्रुत्व करुन नव्हे, तर निसर्गाशी सहकार्य करुन जीवन जगणे असा हा दृष्टीकोन आहे.'[२] यावरुन आदिवासीचा आणि निसर्गाचा किती घनिष्ठ संबंध आहे याचा प्रयत्य येतो.

माणसांवर माणूस म्हणून विश्वास ठेवायला लावणारी आदिम संस्कृती आहे. आदिवासी संस्कृतीत विश्वासाला महत्त्व आहे, विश्वासघाताला नाही. एकमेकांना सहकार्य करण्यावर या लोकांचा भर असतो, फसवण्यात नाही. स्पर्धा करणे, कुरघोडी करणे, हुकूमत गाजवणे, भेदभाव करणे, कमी लेखणे, अशा कांही गोष्टी आदिम संस्कृतीच्या गणितात बसत नाहीत. तरीही भोगवादी संस्कृतीतले लोक स्वत:ची संस्कृती श्रेष्ठ ठरविण्यासाठी आदिवासी संस्कृतीला कमी लेखतात. वरुन रानटी, जंगली, लुटारु, चोर, दरोडेखोर, कावळ्यापेक्षा काळे, राक्षस अशा ओंगळवाण्या शब्दाने हिनवतात.

आदिवासी संस्कृतीच्या संदर्भात दशरथ मडावी म्हणतात की, ''इतर साहित्यिकांनी आदिवासीच्या जीवनावर लेखन केले, तर त्या साहित्याची नाळ जुळत नाही अन् आदिवासींनी लिहिलेल्या साहित्यात आदिवासी संस्कृतीची नाळ कधी तुटत नाही.''[३] आणि हेच खरे आहे. आदिवासी माणूस जगाच्या पाठीवर कुठेही जाऊ द्या, तो आपल्या मूळ संस्कृतीपासून दूर जाऊ शकत नाही किंवा तो तिच्यापासून आलिप्त राहू शकत नाही. कारण की, त्याचे त्या संस्कृतीशी आदिमतेचे नाते जुळलेले असते आणि त्यामुळेच आज तो आपले अस्तित्व व अस्मिता आदिवासी संस्कृतीत शोधण्याचा प्रयत्न करतो.

असा प्रगल्भ संस्कृतीचा वारसा लाभलेला आदिवासी शब्द मात्र, आज बिगर आदिवासींचा चेष्टेचा व टिंगल— टवाळीचा विषय झाला आहे. शासनाचे जावाई म्हणून तो आता सर्वांच्या तोंडी रुळला आहे. एवयावरच न थांबत ही मंडळी आदिवासींना वनवासी या नवाने संबोधू लागली. खरे तर, आदिवासींना वनवासी या शिवीसादृश्य नावाने संबोधने योग्य नाही. तसे म्हणणे म्हणजे त्यांना अपमानित व हिनवण्यासारखे आहे. ज्या व्यक्तिला व समाजाला स्वत:ची संस्कृती नाही, भाषा नाही, रितीरिवाज नाहीत, सांस्कृतिक नीतीमूल्ये नाहीत, देश नाही तो वनवासी समजायला हरकत नाही. परंतु आदिवासी समाज तर जगातला व देशातला मूळ रहिवाशी आहे, त्यामुळे तो वनवासी कसा असू शकेल ? अलीकडच्या काळातील काही

प्रस्थापित लेखक मंडळी आपल्या लिखानात व भाषणात 'आदिवासी' ऐवजी 'वनवासी' या शब्दाचा उच्चार करताना दिसतात, हे योग्य नाही.

''आदिवासी समाज निर्धन असेल, निरक्षर असेल, पण तो असंस्कृत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याला स्वत:ची स्वतंत्र आणि अर्थपूर्ण संस्कृती आहे. स्वत:ची बोली आहे. रितीरिवाज आहेत. दैवत आणि धर्मविधी आहेत. सणसमारंभ व साहित्यकला आहेत.''[४] असा हा समृध्द संस्कृतीचा वारसा आदिवासी समाजाला लाभला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र बदलाची प्रक्रिया अतिशय वेगाने सुरु झाली. तिचा परिणाम आदिवासींच्या जीवनपधतीवर होऊ लागला. आदिवासींच्या नैसर्गिक जीवन व संसाधनांवर त्याचा विपरीत परिणाम झाला. आदिवासी समाजात जातीभेद व वर्गभेद नाही, पण अलीकडे मात्र तोही येऊ लागला. थोडक्यात सांगायचं झालं तर, आदिवासी संस्कृतीचं विकृतीकरण होऊ लागलं.

अलीकडच्या दशकात मात्र आदिवासी समाजातील तरुणांनी स्वसंस्कृती रक्षणाचे प्रयत्न जोमाने सुरु केले आहेत. आदिवासी समाजाचं सघटण, एकता व एकोपा निर्माण करण्यासाठी तरुण पिढी झटत आहे. शिक्षण घेऊन पुढे आलेला तरुण वर्ग आदिवासींच्या भाषा व संस्कृतीपासून दूर जाणाऱ्या आदिमांना 'स्व—संस्कृती' ची जाणीव करुन देऊ लागला. चंगळवादी संस्कृतीपासून आदिवासींची जीवनमूल्ये व त्यांची संस्कृती टिकून राहावी, यासाठीचे प्रयत्न होत आहेत.

''आदिवासी साहित्याचा या संदर्भात विचार करता, आदिवासी साहित्याला फार जुनी व प्राचीन अशी मौखिक परंपरा असून ती समृध्द आहे आणि आदिवासी साहित्य हेच खऱ्या अर्थाने साहित्याचे मूळ आहे.''[५] असे असले तरी त्या साहित्याचा कर्ता मात्र कुणालाच सांगता येत नाही. कारण तो अनामिक आहे. वेदाचा कर्ता कोण, हे जसं कुणाला सांगता येत नाही, तसंच आदिवासी साहित्याचं आहे. आदिवासींच मूळ साहित्य हे मौखिक परंपरेने एका पिढीपासून दूसऱ्या पिढीपर्यंत मौखिक परंपरेने चालत आले. पाठांतराच्या बळावर नंतरच्या पिढीने त्याची जोपासना केली. आणि हेच तर खरे 'अक्षरवामय' होय. आदिवासी समाजात सांगितल्या जाणाऱ्या कथा व गायिली जाणारी गीतं, म्हणी, उखाणे, वाक्यप्रचार हा आदिवासी साहित्याचा ठेवा आहे. अलीकडे त्यालाच लोकसाहित्य म्हटले गेले.

आदिवासी समाजातील काही सुज्ञ लेखक व संशोधकांनी आदिवासी लोकसाहित्याचे संकलन व संशोधन करुन, हा अमूल्य ठेवा जतन करुन ठेवला आहे. त्यात डॉ. संजय लोहकरे, डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. राजेश धनजकर, डॉ. भीमराव वानोळे, डॉ. विश्वनाथ देशमुख, प्राचार्य मोतीराम देशमुख, बाबाराव मडावी, डॉ. सखाराम डाखोरे, प्रा. यशवंत भांडकोळी अशी काही नावे पुढे येतात. आदिवासी माणूस अनादीकालापासून याच लोकसाहित्यावर जगला. हे झाले थोडक्यात लोकसाहित्याच्या बाबतीत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हाच आदिवासी माणूस अल्प प्रमाणात का होईना शिक्षणाकडे वळाला. दऱ्याखोऱ्या व जंगल पहाडात वावरणाऱ्या माणसाला शिक्षणाची दारे खुली झाली. भारतीय संविधनाने इतर नागरिकांना जे अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या व सोईसुविधा दिल्या, त्या आदिवासींनाही प्राप्त झाल्या. याचीच जाण आदिवासी समाजातील काही शिक्षित लोकांना झाली. समाजातल्या अनंत समस्यांवर त्यांचही चिंतन सुरु झालं. समाजाचं दु:ख, व्यथा—वेदना, व भोगांवर तोही आता विचार करु लागला आणि खऱ्या अर्थाने इथूनच आदिवासी साहित्य प्रवाह आपला वेगळा विचार व नवदृष्टी घेऊन उदयाला आला.

आदिवासींच्या लिखित साहित्याचा विचार करता ते अजूनही परिपुष्ठ झाल्याचे दिसत नाही. कारण आदिवासी साहित्यप्रवाहांपैकी आताशी कुठेतरी त्यांच्या कवितेनं बऱ्यापैकी बाळसं धरलं असलं, तरी नाटक व आत्मचरित्र या वामय प्रवाहांकडे अजूनही आदिवासी लेखक फारसा वळाल्याचा दिसत नाही. आदिवासी आत्मकथनाचा विचार केला तर, नजुबाई गावित यांचे घ्आदोर' बाबाराव मडावी यांचे 'आकांत' डॉ. राजेश धनजकर यांचे घ्आंधाचं कारटं' व रामराजे आत्राम यांचे 'उघडा दरवाजा' अशी काही मोजकीच आत्मकथने प्रकाशित झाली. अलीकडच्या काळात नाटककार व

कथाकार मंडळीनी सकस व दर्जेदार अशी नाटकं व कथा समाजाला द्याव्यात अशी अपेक्षा आहे.

कविता :– भुजंग मेश्राम 'ऊलगुलान' 'आदिवासी कविता' वाहरु सोनवणे– 'गोधड', डॉ. विनायक तुकाराम – 'गोडवन पेटले' आहे उत्तमराव धोंडगे – 'वनवासी', प्रभु राजगडकर– 'मोहोळ', वामन शेळमाके– 'जागवा मने पेटवा मशाली', डॉ. संजय लोहकरे– 'पानझडी', डॉ. सखाराम डाखोरे– 'रानवा', पांडूरंग वागतकर – 'व्यथा आदिवासींच्या', सुनील कुमरे – 'तिरकमठा', तुकाराम धांडे– 'वळीव', बाबाराव मडावी – 'पाखरं', पी.डी. आत्राम– 'पहाडी हुंकार', उषाकिरण आत्राम – 'म्होरकी', कविता आत्राम – 'काजवा', शंकर बळी– 'ही वाट तिथुनी जावी', किशोर डोके– 'तटबंदी'.

कथासंग्रह :– उषाकिरण आत्राम–'अहेर', बाबाराव मडावी– 'भाकर', डॉ. संजय लोहकरे– घ्याब', रामराजे आत्राम – 'नवं लुगडं'.

कादंबरी :– नजुबाई गावित– 'भिवा फरारी', बाबाराव मडावी– 'टाहो', डॉ. संजय लोहकरे– 'देस + ठेकेदार', डॉ. कृष्णा भवारी–इधोस, तुकाराम चौधरी– 'पाड्यावरचा टिल्ल्या'

नाटक :– विठ्ठलराव कन्नाके – जन बुळतालपेन, दशरथ मडावी– श्री नॉट श्री.

अशी काही मोजकीच साहित्यनिर्मिती आदिवासी साहित्यिकांकडून प्रकाशित झाल्याची दिसते. अजूनही आदिवासी लेखकांनी कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र या वामय प्रकारांकडे वळणे गरजेचे आहे. कारण त्यातूनच समाजाला नवा विचार व नवी दृष्टी प्राप्त होईल. गेल्या काही वर्षात आदिवासी समाजावर अन्याय व अत्याचार होऊ लागले. अनेक ठिकाणी बलात्काराच्या घटना घडल्या. आश्रमशाळेतील मुलींची सुरक्षितता धोक्यात आली. बोगस जात प्रमाणपत्राचा प्रश्न तोही ज्वलंत आहे. आदिवासी विकास योजनांचे तीन–तेरा वाजले. या व अशा अनेक प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी साहित्यिक वर्गाने आपल्या कलाकृतीतून समाजाला वैचारिक बळ दिलं पाहिजे, त्यांच्यात संघर्ष करण्याची ताकद निर्माण केली पाहिजे.

मागील काही वर्षात आदिवासींची स्वतंत्र अखिल भारतीय साहित्य संमेलने होऊ लागली. त्यामुळे नवलेखकांना हक्काचे विचारपीठ उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर विचारवेध साहित्य संमेलन, समरसता साहित्य संमेलन, राष्ट्रीय परिषदा, राष्ट्रीय चर्चासत्र, परिसवांद, आदिवासी कवी संमेलने व साहित्यिक मेळावे भरु लागले. त्यामुळे विविध साहित्य प्रवाहांवर वैचारिक मंथन होत आहे. विचारांचे अदान–प्रदान होऊन संशोधकवृत्ती वाढीस लागत आहे. आदिवासी माणूस लिहितो व तेवढाच पोटतिडकीने बोलतो, हे साहित्य जगताला आताशी कुठे ठाऊक झाले आहे. यापुढे ही आदिवासी साहित्यिकांकडून श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृती निर्माण होतील अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही. कारण की, आदिवासी समाजात आज शिक्षणाचं प्रमाण बऱ्यापैकी वाढलं आहे. थोडंबहुत समाजाचं संघटनही होताना दिसत आहे. तरुण वर्गाने समाज जागृतीचे काम हाती घेतल्याचे दृष्टीस पडत आहे. चळवळीच्या माध्यमातून समाज जागृत होऊ लागला. हजारो वर्षे मुका व भित्रा असलेला आदिवासी माणूस बोलू लागला. समाजाच्या अनंत समस्यांचे पाढे तो शासन दरबारी वाचू लागला, हे आदिवासी समाजाच्या प्रगतीचं लक्षण मानायला हवं.

**संदर्भ :–**


१. डॉ. वैजनाथ अनमुलवाड– 'आदिवासी समाज, संस्कृती आणि साहित्य' इसाप प्रकाशन, नांदेड–१५ नोंव्हेबर २०१२ पृ.१३.
२. डॉ. धनाजी गुरव– 'आदिवासी साहित्य वा मयसेवा' प्रकाशन, नाशिक रोड, ३१ डिसेंबर २००८, पृ.३२.
३. डॉ. संतोष हंकारे– 'समकालीन मराठी साहित्यप्रवाह' प्रथमेश प्रकाशन, नांदेड –१२, १३ ऑक्टो. २०१३, पृ.२५३.
४. डॉ. धनाजी गुरव – 'आदिवासी' साहित्य, पृ.१०५.
५. डॉ. संतोष हंकारे – 'समकालीन मराठी साहित्यप्रवाह', पृ.२५४.


❑❑❑